# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.दुरध्वनी क्र. 28192828.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./मनपा/आस्था/ 1060/2023-24 दि:21/07/2023

## मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता ठोक मानधनावरील थेट मुलाखत

**(Walk In Selection)**

### जाहीर सूचना

मा.आयुक्त तथा प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका, महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता ठोक मानधनावर 06 महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ), वैद्यकीय अधिकारी व प्रसविका ही पदे थेट मुलाखतीद्वारे (Walk In Selection) भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणेची विनंती करीत आहेत. संबंधित पदापुढे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक संच व मूळ प्रमाणपत्रांसह दि. 01/08/2023 रोजी सकाळी 10.00 ते 1.00 या कालावधीत मा.स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),जि.ठाणे-401101 येथे मुलाखतीकरीता उपस्थित राहावे.

**1) वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) - 01 पद (ठोक मासिक मानधन रु. 95,000/-)**

| अ.क्र. | अ.जा. | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.ब | भ.ज.क | भज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | ई.डब्ल्यु. एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 01 | - | - | - | - | - | - | - | - | - | 01 |

**2) वैद्यकीय अधिकारी एकूण - 07 पदे ( ठोक मासिक मानधन रु. 80,000/-)**

| अ.क्र. | अ.जा. | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.ब | भ.ज.क | भज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | ई.डब्ल्यु. एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | - | - | - | 01 | 01 | - | - | 03 | 02 | - | 07 |

**3) प्रसविका - 04 पदे (ठोक मासिक मानधन रु. 20,000/-)**

| अ.क्र. | अ.जा. | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.ब | भ.ज.क | भज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | ई.डब्ल्यु. एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | - | - | - | - | - | - | - | 01 | 03 | - | 04 |

**विशेष सुचना :-**

1) पदांच्या संख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

2) उपरोक्त अनु क्र.01 ते 03 मधील पदे आस्थापनेवर कायम स्वरुपी भरल्यास ठोक मानधनावर भरण्यात आलेल्या उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

3) सदर जाहिरात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

➢ **ठोक मानधनावर वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ), वैद्यकीय अधिकारी व प्रसविका या पदांची शैक्षणिक पात्रता/अर्हता –**

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1. | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी (स्त्री व प्रसुतीरोग शास्त्र) किंवा समकक्ष पदवी. तथापी, पदव्युत्तर पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद पदव्युत्तर पदविकाधारकामधून (DCH) भरण्यात येईल.<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| 2. | वैद्यकीय अधिकारी | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस)<br>ब) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| 4. | प्रसविका | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C) उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ए.एन.एम अभ्यासक्रम पूर्ण.<br>क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

**1. वयोमर्यादाः-**

1.1 किमान वयोमर्यादा 18 वर्षे पूर्ण व कमाल 38 वर्षे, मागासवर्गीय उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा 43 वर्षे राहील.

**2. पद भरती गुणांकनाची विस्तृत कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील-**

2.1 जाहिरातीत नमूद पदांवर अधिकारी व कर्मचाऱ्यांची थेट मुलाखत (Walk in Selection) पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल. उमेदवारास 100 पैकी गुण देण्यात येतील.

2.2 निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

2.3 निवड यादी गुणानुक्रमे प्रसिध्द करण्यात येत असल्याने निवड झालेल्या उमेदवारा व्यतिरिक्त इतर सर्व उमेदवार प्रतिक्षा यादीत राहतील.

2.4 प्रतिक्षा यादीची विधी ग्राहयता 1 वर्षाची असेल. निवड झालेले उमेदवार रुजू न झाल्याने अथवा कार्यरत असलेले उमेदवार सोडून गेल्याने पुढील 1 वर्षात कोणतेही पद रिक्त झाल्यास, सदर पद प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून भरण्यात येईल.

3. **उमेदवार निवडण्याची पध्दत**:-

3.1 मुलाखतीस येताना अर्जदाराने मूळ प्रमाणपत्रे आणावीत. तसेच अर्जासोबत खालील क्रमाने मूळ प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.

अ) शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला

ब) शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेची प्रमाणपत्र व गुणपत्रिका

क) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी (वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी)

ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र (प्रसविकांसाठी)

इ) जातीचे प्रमाण पत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र

ई) नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र (सन 2023-24)

उ) डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्रात वास्तव्य).

3.2 मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा कोणताही खर्च दिला जाणार नाही.

3.3 फक्त याच जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. महानगरपालिकेकडे यापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचे अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत.

3.4 उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास, पदनिहाय स्वतंत्र अर्ज वैयक्तिक माहितीसह (Bio-Data) व त्यासोबत शैक्षणिक पात्रता व इतर नमूद कागदपत्रे विहीत नमुन्यात जोडून सादर करणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात नसलेले/अपूर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

3.5 उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

3.6 आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16/अ, दि.12/02/2019 व दि.31/05/2021 अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

3.7 एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाब आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास, त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

3.8 सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2010/12, दि.28/03/2005 व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दि.01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दि.28/03/2005 नुसार हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबतच्या नमुन्यात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अविवाहित असणाऱ्या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्रात अविवाहित असे लिहून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

3.9 निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल./शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

3.10 एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दि.27/06/2008 मधील निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

3.11 अंतिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

3.12 निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबादल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल

3.13 जाहिरातीमधील नमूद पदसंख्या कमी अथवा अधिक करण्याचे तसेच कोणतीही भरती पदे रद्द करण्याचे अधिकार आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. पद संख्येच्या व आरक्षणाच्या बदलाबाबत मुलाखतीच्या दिवशी उमेदवारांना अवगत करण्यात येईल.

3.14 प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

3.15 निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश 06 महिन्याकरिता देण्यात येईल. तद्नंतर त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

## 4. <u>विशेष सूचना :-</u>

4.1 मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. त्यातून फसवणूक झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

4.2 सदर भरती प्रक्रियेतील निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांव्यतिरिक्त उर्वरीत सर्व कागदपत्रे फक्त तीन महिन्यापर्यंत महानगरपालिकेकडे उपलब्ध राहतील.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- .................................................................. )

प्रति,

मा.आयुक्त तथा प्रशासक,
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- 401 101.

(1) संपूर्ण नांव : मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)

1. **आडनाव** : ...................................... ......................................

2. **स्वत:चे नाव** : ...................................... ......................................

3. **वडिलांचे/ पतीचे नाव** : ...................................... ......................................

(2) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिन कोडसहित)** : ..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक** : ..............................................................................

(3) **अ) जन्मतारीख** : **तारीख** **महिना** **वर्ष**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब) मुलाखतीच्या दिनांक रोजीचे वय** ..........................**वर्ष**..........................**महिने**............**दिवस**

(4) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय / अभारतीय**

(5) **अर्जदार महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय ?** : **होय/नाही**

(6) **जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓) अशी खुण करावी.**

| अ.जा. | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.ब | भ.ज.क | भज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | ई डब्ल्यु एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(7) **जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या संवर्गासाठी उमेदवाराचा स्वतःचा प्रवर्ग खालीलप्रमाणे लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓) अशी खूण करावी.**

| अ.जा. | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज .ब | भ.ज. क | भज. ड | वि.मा.प्र . | इ.मा. व. | ई डब्ल्यु एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(8) **शैक्षणिक अर्हता:**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |

(9) **अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)**

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

(10) **आपणाविध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय ?**

| होय | नाही |
|---|---|
| | |

(11) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

**1)** ........................... **2)** .............................. **3)** ......................................

**4)** ............................ **5)** .............................. **6)** .......................................

**मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही/-

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा

नमुना-अ

(नियम 4 पाहा)

मी श्री./श्रीमती................................................ श्री................................................ यांचा/ यांची/ मुलगा/ मुलगी/ पत्नी, वय............. वर्षे, राहणार................................................................. याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1) मी............................................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला............. इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी **28** मार्च, **2005** यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक **28** मार्च, **2006** व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण** :-

**दिनांक** :-

**अर्जदाराची सही/-**